**MHPU180026052021**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | – | २९.१२.२०२१ | | |
| नोंदणी तारीख | – | ०६.०१.२०२२ | | |
| निकाल तारीख | – | ०७.०३.२०२६ | | |
| कालावधी | – | <u>वर्ष</u> | <u>महिना</u> | <u>दिवस</u> |
| | | **०४** | **०२** | **०९** |

**<u>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे यांचे न्यायालयात</u>**

(पीठासीन अधिकारीः– श्रीमती एस. ए. विराणी)

(पारित दिनांक ०७.०३.२०२६)

**<u>फौ.कि.अ.क्र.०५/२०२२</u>** **<u>निशाणी क्र.४२</u>**

१. **सारिका आनंद खरात,** }
वय– २७ वर्षे, धंदा– काही नाही. }

२. **समृध्दी आनंद खरात,** }
वय– ४ वर्षे. }
दोघे राहणार – मु. पो. वाटलुज, ता. }
दौंड, जि. पुणे } .... **<u>अर्जदार</u>**

**<u>विरुध्द</u>**

१. **आनंद नाना खरात,** }
वय– ३० वर्षे, धंदा– शेती, }
रा. – एफ ९२, सेक्टर १ कळंबोली, }
नवी मुंबई ४१०२१८ }

२. **नाना सखाराम खरात,** }
वय– ५५ वर्षे, धंदा– शेती, }

३. **जनाबाई नाना खरात,** }
वय– ५० वर्षे, धंदा– शेती, }
२ व ३ रा.– निंबोडी, ता. खंडाळा, }
जि. सातारा. }

४. **सुशिला सखाराम कोळेकर,** }
वय– सज्ञान, धंदा– शेती, }
राहणारः– निंबुत छपरी, सोमेश्वर नगर }

जवळ, ता. बारामती, जि. पुणे. } .... **जाबदार**

**अर्जः–** कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १७,१८, १९, २० अन्वये.

.....................................................................................................

अर्जदारांतर्फे विधीज्ञ – **श्री. बी. व्ही. देशमुख**

जाबदारांतर्फे विधीज्ञ – **श्री. के. डी. शेळके.**

.....................................................................................................

**न्यायनिर्णय**

(घोषित दिनांकः– ०७.०३.२०२६)

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १७, १८, १९ आणि २० प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराची अर्जातील कथने थोडक्यात अशी आहेत की, अर्जदार क्र. १ व जाबदेणार क्र. १ यांचा विवाह हिंदू धर्म शास्त्राप्रमाणे व जातीरीवाजाप्रमाणे दि. २७/११/२०११ रोजी झालेला असुन सदरचा विवाह अर्जदार क्र. १ यांचे आईवडीलांनी अर्जदार क्र. १ चे मामा ज्ञानदेव बाबा शेळके रा. मु.पो निबोंडी (पानमळा) ता. खंडाळा जि. सातारा यांच्या दारात करून दिलेला असुन अर्जदार क्र. १ हया जाबदेणार क्र. १ यांच्या कायदेशीर धर्मपत्नी आहेत. जाबदेणार क्र. २ हे अर्जदार क्र. १ यांचे सासरे असुन जाबदेणार नं. ३ हया अर्जदार यांच्या सासु आहेत. जाबदेणार क्र. ४ हया अर्जदार क्र. १ यांच्या ननंद आहेत. जाबदेणार क्र. २ व ३ यांनी अर्जदार क्र. १ यांचे लग्न जमवते वेळी अर्जदारांचे आई वडीलांना व बैठकीमधील लोकांना म्हणाले होते की, जाबदेणार क्र. १ (मुलगा) पंधरावी शिकलेला आहे. तो मुंबईला नोकरी करतो त्याला ४०,०००/– रू. पगार आहे. लग्नानंतर तुमची मुलगी त्याचे बरोबर मुंबईला रहाणार आहे. त्यामुळे तुम्ही लग्नात चांगला झाल झेंडा दया, त्यावर विश्वास ठेवून अर्जदार यांचे आई वडीलांनी स्वत: कर्जबाजारी होऊन मुलगी अर्जदार हिचे चांगले होणार आहे. म्हणुन लग्नात जाबदेणार क्र. १ चे आईवडीलांचे मागणी प्रमाणे दिवाण, गादी, शोकेस, कपाट, स्वयंपाकाचा

गॅस, शेगडी, सोफासेट, कुलर, ड्रेसिंग टेबल व सर्व प्रकारची संसार उपयोगी भांडी कुंडी अशा वस्तु जाबदेणार यांचे पसंतीने घेवुन देवुन जाबदेणार क्र. १ यांचे बरोबर अर्जदार क्र. १ यांचे मामाचे दारात जाबदेणार यांचे गावात लग्न करून दिले आहे. त्यामुळे अर्जदाराचे आई वडील अजुनही कर्जबाजारी असुन कर्जफेड करीत आहेत. लग्नानंतर अर्जदार क्र. १ हे जाबदेणार क्र. १ ते ३ यांचे घरी निंबोडी येथे नांदवायास गेल्या.

३. लग्नानंतरचे धार्मीक विधी पार पाडल्यानंतर अर्जदार क्र. १ हे ४ ते ५ दिवस माहेरी आल्या व तद्नंतर जाबदेणार क्र. २ सासरे हे अर्जदार क्र. १ हिला त्यांचे घरी नांदावयास घेवून गेले. लग्नांनतर जाबदेणार क्र.१ हे सुमारे १ महिना गावी निंबोडी येथे राहिले. तेव्हा अर्जदार क्र. १ जाबदेणार क्र. १ यांना म्हणाले की, तुम्ही मला मुंबईला कधी नेणार आहात, मी अजुन मुंबई पाहिली नाही. त्यावर जाबदेणार क्र. १ अर्जदार क्र. १ वर खूपच भडकले होते, खूप चिडले होते. तेव्हा अर्जदार क्र. १ जाबदेणार क्र. १ यांना म्हणाले, 'तुम्ही व तुमचे वडील लग्नापुर्वी तुला मुंबईला रहावे लागेल, असे म्हणत होते म्हणुन मी तुम्हांला बोलले. जाबदेणार क्र. १ हे लग्नानंतर सुमारे १ महिना गावी निंबोडी येथे अर्जदारासह राहिले व तद्नंतर जाबदेणार क्र. १ मुंबईला त्यांचे नोकरीचे ठिकाणी गेले. सदर काळात अर्जदार क्र. १ जाबदेणार क्र. २ व ३ सह धाकटे दिर यांचे सह कोळेकर वस्ती निंबोडी येथे राहु लागल्या. लग्न झालेली ननंद जाबदेणार क्र. ४ सौ. सुशिला कोळेकर हया निंबुत छपरी येथे नांदत असतात, त्या वेळोवेळी माहेरी निंबोडी येथे वस्तीवर घरी येत जात असत.

४. जाबदेणार क्र. २ व ३ यांचे राहत्या वस्ती वरून सुमारे अर्धा तास अंतरावर त्यांचे ४ एकर बागायत क्षेत्र आहे. तेथे अर्जदार क्र. १ यांना जाबदेणार क्र. २ व ३ सासरे व सासू हिला रोज घरातली सर्व कामे उरकुन, तसेच दोन जरशी गाईचा गोठा काम करून त्यांचे सासू सास-या बरोबर शेतात दिवसभर काम करण्यासाठी घेवुन जात असत. कामे उरकता उरकता थोडा उशीर झाला तरी सासरे अर्जदार यांना घालुन पाडून बोलुन छळत असत. जाबदेणार क्र. १ महिन्यातुन सुमारे ४ दिवस गावी येवुन रहात असत व पुन्हा मुंबई येथे जात येत होते. पहिले दोन ते तीन महिने वर नमूद प्रमाणे जाबदेणार क्र. १ ते ३ यांनी अर्जदार यांना ब-यापैकी नांदविले, तद्नंतर जाबदेणार क्र. १ पती आनंद हे मुंबई वरून ४ दिवसांसाठी गावी आले तर त्यांचे कान जाबदेणार क्र. २ व ३ म्हणजे सासू सासरे भरीत असत. तसेच

ते सारीका शेतातले काम करीत नाही, घरचे नीट पाहत नाही, असे सांगत असत. त्यांचे ऐकुन जाबदेणार क्र. १ हे अर्जदार क्र. १ यांना रागावत असत व तिला दोन दोन दिवस उपाशी ठेवा म्हणजे ती जाग्यावर येईल, तिची मुंबई येथे वस्तीवरच करू अशी धमकी देवून म्हणून जाबदेणार क्र. १ पती हे अर्जदार क्र. १ यांना वेळोवेळी मारहाण करीत असत. त्यामुळे अर्जदार क्र. १ यांनी जाबदेणार क्र. १ यांना भिती पोटी नोटीस पाठवेपर्यंत व नोटीस उत्तरातून पत्ता समजेपावेतो आजपावेतो, जाबदेणार क्र. १ मुंबई मध्ये कोठे राहतो, कसली नोकरी करतो याची चौकशी करण्याची देखील धैर्य दाखविलेले नाही. तसेच जाबदेणार यांनी देखील त्यांचे बाबत ते मुंबईला कोठे नोकरी करतात, कोठे राहतात याचीदेखील माहिती अर्जदार यांना जाबदेणार क्र. १ ते ४ यांनी दिलेली नाही. तरी देखील जाबदेणार त्या सर्वाचा जाच, हाट, छळ, मारहान व भिती सहन करीत अर्जदार क्र. १ जाबदेणार क्र. १ कडे नांदतच होत्या.

**५.** अर्जदार क्र. १ जाबदेणार यांचेकडे सासरी नांदत असताना त्यांना मुल बाळ होत नाही, म्हणून जाबदेणार क्र. १ ते ४ म्हणजे पती व सासु सासरे, ननंद हया अर्जदार क्र. १ यांना वेळोवेळी छळत होते. ते अर्जदार यांना नेहमी म्हणत, "तु वांझोटी आहेस. तुला मुलबाळ होणार नाही." असे म्हणुन जाच हाट करून, " तु दुसरे लग्न करायला आनंदला परवांनगी दे." असे वेळोवेळी म्हणून अर्जदार क्र. १ यांचा मानसिक व शारिरिक छळ करीत असत. तरीदेखील जाबदेणार क्र. १ ते ४ या सर्वाचा जाच हाट, छळ, अपमान, मारहाण सहन करून अर्जदार क्र. १ हे जाबदेणार क्र. १ बरोबर संसार व्हावा, म्हणून त्यांचे गावी त्यांना त्यांनी मुंबईला नेले नाही तरी नांदतच होत्या.

**६.** अर्जदार क्र. १ या जाबदेणार यांचे कडे नांदत असताना लग्नांनतर सुमारे ४ वर्षाने अर्जदार यांना दिवस गेले. तथापी सदर काळात जाबदेणार क्र. १ ते ४ यांनी अर्जदार यांचा कोणतीही आपुलकीने साधी चौकशी केली नाही, त्यांची गरोदर काळात देखभाल केली नाही, दवाखाना उपचार केला नाही, ओटी भरणाची नाव घेतले नाही, ९ व्या महिन्यात माहेर वाटलूज येथे बाळंतपणास पाठविले. अर्जदार क्र. १ दि. १९/०८/२०१६ रोजी माहेरी बाळंत झाल्या. त्यांना मुलगी झाली तिचे नाव शिवांगी ठेवले आहे. मुलगीच का झाली मुलगा का झाला नाही म्हणून जाबदेणार क्र. १ ते ४ नाराज झाले होते. सदर काळात जाबदेणार यांनी अर्जदार व लहान

बाळाची कोणतीही काळजी घेतली नाही. बाळांतपणाचा किती खर्च झाला, सिझर झाली की, घरीच बाळंत झाली याची चौकशी देखील केली नाही. बाळंतपणानंतर जाबदेणार क्र. २ कडे अर्जदार व त्यांचे लहान बाळास सुमारे ३ महिन्यानंतर निंबोडी गावी घेवून गेले.

७. अर्जदार हे लहान मुलीसह सदर ठिकाणी जाबदेणार यांचे कडे जाऊन नांदू लागल्या, नेहमी प्रमाणे जाबदेणार क्र. १ महिन्यातुन ४–५ दिवस मुंबईवरून गावी येत जात होते. सदर नांदते काळात पुन्हा अर्जदार क्र. १ यांना दिवस गेले. पुन्हा अर्जदार क्र. १ यांना बाळंतपणासाठी माहेरी वाटलूज ता. दौंड येथे पाठवून दिले. तथापी सदर वेळी थोरली मुलगी शिवाणीला ती खुप लहान असुन देखील जाबदेणार क्र. १ ते ४ या लोकांनी लहान मुलगी शिवाणीला अर्जदार क्र. १ यांचे सोबत माहेरी पाठवून दिले नाही. तिला तिचे मनाविरुध्द व अर्जदार क्र. १ यांचे मनाविरूध्द जाबदेणार यांनी त्यांचे कडे ठेवून घेतले. शिवाणी लहान असल्यामळे ती त्यावेळी खूप रडत होती. आरडा ओरड करीत होती आई आई म्हणून टाहो फोडत होती, परंतू जाबदेणार यांनी कोणीही तिला अर्जदार क्र. १ हिच्या बरोबर पाठविले नाही. अर्जदार क्र. १ च्या मनाचा व आईपणाचा जाबदेणार क्र. १ ते ४ यांनी कोणताही विचार केला नाही. त्यामळे अर्जदार यांना मानसिक त्रास झाला तो अजुनही चालूच आहे. अर्जदार क्र. १ यांना त्यांचे आई नातेवाईक यांचे बरोबर जाबदेणार क्र. १ ते ४ हे कधीही मोबाईल बोलू देत नव्हते. जाबदेणार हे जाणिवपूर्वक व हेतु पुरस्पर जाबदेणार क्र. १ ते ४ हे अर्जदार यांना नाहक त्रास देत आहेत. तसेच अर्जदार यांचे माहेर कडील कोणी कधीही आपुलकीने भेटावयास आले तर अर्जदार हया शेतात असत. परंतू शेतानुन परत आलेवर देखील कोणीही त्यांना सांगत नसत नंतर माहेरी आलेवर त्याची माहिति अर्जदार यांना माहिती होत होती.

८. अर्जदार क्र. १ यांना दूस–यांदा बाळंतपणासाठी माहेरी वाटलूज येथे पाठवून दिले. त्या दि. ०६/११/२०१७ रोजी बाळंत झाल्या. त्यांना दुस–यांदा देखील मुलगीच झाली. तीचे नाव समृध्दी आहे. दुसरी पण मुलगी झाली, मुलगा झाला नाही याचा राग धरून अर्जदार क्र. १ यांना त्यांचे बाळंतपणानंतर सुमारे ५ महिन्यानी जाबदेणार यांनी निंबोडी गावी घेवून गेले. त्यावेळी अर्जदार क्र. १ सुमारे १ वर्ष जाबदेणार यांचेकडे नांदल्या. सदर नांदते काळात जाबदेणार १ ते ४ हे सर्व अर्जदार क्र. १ यांना, तुला मुली होतात, मुलगा होत नाही. या कारणा वरून

पहिल्यापेक्षा जास्त जाच हाट करू लागले. जाबदेणार क्र. १ हे अर्जदार क्र. १ यांना दुसरी पण मुलगीच झाल्याने त्यांचे मारहाण करण्याचे प्रमाण वाढले. तसेच अर्जदार क्र. १ कडे सर्व जाबदेणार हे जाणिव पूर्वक दुर्लक्ष करीत असत. ती आजारी पडली तरी तिचेवर डॉ. उपचार करीत नसत. ती सोंग करते, काम करायला नको म्हणून आजार पणाचे ढोंग करते असे म्हणून अर्जदार क्र. १ यांना छळत होते. तसेच दुसरे लग्नाला संमती दे असे म्हणून अर्जदार क्र. १ यांना त्रास देत होते. तद्नंतर सदर नांदते काळात दिवाळीचा सण आला अर्जदार क्र. १ यांना माहेरी जायचे होते. आई वडीलांची सारखी आठवण येत होती, म्हणून अर्जदार क्र. १ जाबदेणार हे तिला माहेरी पाठवित नाही, म्हणुन पुन्हा जाबदेणार यांचे सांगणे वरून अर्जदार क्र. १ यांनी त्यांचे वडीलांना बोलावुन घेतले व १५ दिवसांनी जाबदेणार क्र. १ यांना न्यायला पाठवा मी येते असे सांगून अर्जदार सन २०१९ मध्ये दिवाळीचे काळात माहेरी आली. तथापी तेव्हा देखील जाबदेणार यांनी अर्जदार क्र. १ यांची थोरली मुलगी शिवानीला अर्जदाराबरोबर पाठविले नाही. त्यांनी जाणिवपुर्वक व हेतुपूरस्पर मायलेकरीची ताटातुट केली. शिवाणीने त्यावेळी रडुन रडुन खुप दंगा केला तरी तिला अर्जदाराबरोबर माहेरी वाटलुज येथे पाठवुन दिले नाही. तसेच १५ दिवसानंतर वेळोवेळी अर्जदार क्र. १ यांनी जाबदेणार यांना न्यायला या असे सांगुन देखील कोणीही नेण्यास आले नाही. तेव्हा अर्जदार म्हणाले 'मी वडीलांना घेवून येवु का ' असे वेळोवेळी विचारात असत. परंतु जाबदेणार आम्ही तुला नेण्यास येतो असे सांगुन गेले दोन अडीच वर्षापासुन अर्जदार यांना कोणीच नेण्यास आले नाहीत. जाबदेणार क्र. १ पती हे तर अर्जदार क्र. १ यांचा फोन देखील उचलीत नाहीत. तथापी जर फोन वर बोलले तर शिवीगाळ करूनच सुरुवात करतात व दुसऱ्या लग्नाला परवानगी मागतात.

९. जाबदेणार क्र. १ पती आनंद व सौ. सुशिला ननंद जाबदेणार क्र. ४ हे अर्जदार यांचे माहेरी सुमारे २ महिन्यापूर्वी वाटलुजला माहेरी आले होते. तेव्हा अर्जदार यांनी आणलेला पाण्याचा तांब्या देखील त्यांनी नाकारला व म्हणाले, आम्हांला मोकळे करा आम्ही सारीकाला नेणार नाही, सोडचिट्टी दया अशी धमकी देवुन व शिवीगाळ करून दोघे बहिण भाऊ निघून गेले.

१०. जाबदेणार हे जाणिव पुर्वक अर्जदार यांना नांदवण्यास नेण्यास टाळाटाळ करीत आहेत. अर्जदार यांची हेळसांड करीत आहेत. जाबदेणार क्र. १ यांनी अर्जदार

यांना घेऊन जावे म्हणून जाबदेणार यांना अर्जदार यांनी दि. २९/ ११/२०२५ रोजी वकीला मार्फत नोटीस पाठविली. त्या नोटीसीला जाबदेणार क्र. १ यांनी कोणत्याही प्रकारे उत्तर दिले नाही व अर्जदारांना न्यायला देखील आले नाही. उलट कहर म्हणजे जाबदेणार क्र. २ सासरे यांनी अर्जदाराच्या नोटीसला खोटया मजकुराचे उत्तर दिले. नव–याची सर्व जबाबदारी मी घेतो आहे असे बेफिकीर पणे वर्तन केले. शेतात काम करायला बाई मिळेल अशा समजुतीने १,०००/– रु. मनिऑर्डर पाठवली.

**११.** जाबदेणार यांनी अर्जदार व त्यांची अज्ञान मुलगी समृध्दी हिची गेले दोन ते अडीच वर्षापासुन कोणतीही काळजी घेतली नाही. त्यांचा कपडालत्ता, दवाखाना त्यांचे संगोपण तसेच त्यांचे उदानिर्वाहकामी कधी दोन पैसे देवुन अर्जदार क्र. १ चे पती व मुलीचे जन्मदाते म्हणुन देखील कोणतेही कर्तव्य पार पाडलेले नाही. जाबदेणार यांचे बेजबाबदार वृत्तीमुळे व मारहाण, मानसिक छळामुळे गेले तीन ते साडे तीन वर्षापासुन अर्जदार व त्यांचे आई वडीलांनी धास्ती घेतली आहे. त्यामुळे अर्जदाराचे आई वडीलांचा आजार वाढला आहे. त्यांना काम धंदा होत नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ व त्यांची मुलगी हे अर्धपोटी तर कधी उपाशी पोटी राहून जीवन जगत आहे. ते सर्व त्यांचे मनाविरूध्द माहेरी वाटलूज येथे राहत आहेत.

**१२.** अर्जदार यांनी जाबदेणार क्र. १ यांना वकीलांमार्फत दि. २९/११/२०२१ रोजी कायदेशीर नोटीस पाठवून अर्जदार यांना घेऊन जाण्याची विनंती केली व चांगले वागवू बाबतची हमी मागितली. तसेच नांदण्यास नेले नाही. तर अर्जदार क्र. १ यांना दरमहा प्रत्येकी ७ हजार व मुलीचे संगोपणासाठी दरमहा प्रत्येकी ५ हजार असे मिळून एकूण १२,०००/– रू. दरमहा मागणी केली. तथापी जाबदेणार यांनी त्याबाबत कोणतीही दखल न घेता अर्जदाराने पाठविलेल्या नोटीसला सासरे जाबदेणार क्र. २ यांनी खोटया मजकुराचे नोटीस उत्तर दि.१३/१२/२०२१ रोजी दिले आहे.

**१३.** अर्जदार क्र. १ व २ हे त्यांचे मना विरूध्द माहेरी राहत असुन त्यांची जाबदेणार यांनी माहेरी हाकलुन दिलेपासुन त्यांचे अन्न, वस्त्र, निवारा याची कोणतीही सोय केलेली नाही. सध्या सर्व अर्जदार हे उपाशीपोटी राहून दिवस काढत आहेत. तसेच जाबदेणार यांनी सदरील अर्जदार हिस माहेरी हाकलुन दिल्यानंतर

त्यांनी आपली पत्नी व मुलगी या नात्याने आपले कर्तव्य म्हणुन कोणत्याही जाबदेणाराने साधी चौकशी सुध्दा केली नाही, त्यांच्या राहण्याची, उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केली नाही, अर्जदार हिस स्वत:चे असे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही, निवासाची सोय नाही व आई वडीलांची घरची परिस्थिती हलाकीची व गरीबीची असुन त्यांना त्यांचाच उदरनिर्वाह करणे शक्य होत नाही, त्यामुळे अर्जदार आजमितीस खुप दयनिय अवस्थेत जिवन कंठीत असून जाबदेणार हे मात्र सुखाने जगत आहेत.

**१४.** जाबदेणार क्र. १ यांची आर्थिक स्थिती चांगली आहे ते नोकरी करतात त्यांचे वार्षीक उप्पन्न रु. २,१०,०००/–पर्यंत आहे. तसेच निंबोडी गावी ४ एकर शेतीवाडी बागायत आहे. अर्जदार क्र. १ व २ यांची वर नमूदप्रमाणे दयनीय अवस्थेत जीवन जगत असताना जाबदेणारांची आर्थिक परिरिथती खूप चांगली असून त्यांचे वार्षिक उत्पन्नही चांगली आहे. तसेच सदरील अर्जदारांचे निवासासह उदरनिर्वाह व संपूर्ण व्यवस्था व अर्जदारची काळजी घेण्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी जाबदेणार यांची आहे. परंतु त्याचे ते पालन करीत नाही. सासरी नांदण्यास ठेवून घेत नाहीत, शारिरीक सूख देत नाहीत. उलट मारहाण करतात, छळ करतात उपाशी ठेवतात, दुस–या लग्नाला परवानगी मागतात. लहान मुलगी शिवाणीला हिसकावुन घेवुन मायलेकीची ताटातूट केली, त्यामूळे अर्जदार यांचे जीवन जाबदेणारापासून सुरक्षित राहिलेले नाही, तसेच अर्जदार हिस उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही, अर्जदारांची उपासमार होत आहे. म्हणन अर्जदार क्र. १ व २ यांना त्यांचे उदरनर्वाहाकरीता अर्जदार क्र. १ यांना स्वतः करीता दरमहा र. रू.७,००० /– रूपयाची व अर्जदार क्र. २ यांना दरमहा प्रत्येकी ५,०००/– रू.ची अशी एकूण दरमहा रु. १२,०००/– ची आवश्यकता आहे. तसेच स्वतंत्र राहण्याची देखील आवश्यकता आहे, व सदरच्या दोन्ही बाबी व रक्कम देण्याची जाबदेणारांची ऐपत आहे.

**१५.** अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार क्र. १ यांना जाब देणार क्र. १ यांचेकडुन कायमस्वरूपी पोटगी म्हणुन दरमहा त्यांचे उदरनर्वाहाकरीता स्वतः करीता दरमहा र. रू.७,००० /– रूपयाची व अर्जदार क्र. २ यांना दरमहा प्रत्येकी ५,०००/– रूची अशी एकूण दरमहा रु. १२,०००/– ची (बारा हजार रूपये फक्त) देण्याचा हुकूम करण्यात यावा. तसेच अर्जदार यांची थोरली मुलगी शिवाणी

हिला तिचे बाल मनावर कोणतेही आघात व परिणाम होवू नयेत, माय लेकरांची ताटातूट होवू नये म्हणुन अर्जदार क्र. १ यांचे स्वाधीन करण्याचे आदेश व्हावेत. अर्जदार यांना एकत्र कुटुंबात ठेवण्याची जाबदेणार यांची तयारी नसेल तर तिची स्वतंत्र खोलीची व्यवस्था करावी व इतर सेवा सुविधा देवुन त्यासाठी आर्थिक तरतुद म्हणुन र.रू. ३०००/-(तीन हजार रूपये) घरभाडे म्हणुन देण्याचा हुकूम व्हावा. पुढे अर्जदाराने नुकसान भरपाई म्हणून रक्कम रुपये २,००,०००/- (अक्षरी दोन लाख रुपये फक्त) देण्याची आणि सदर अर्जाचा संपूर्ण खर्च रक्कम रु. १०,०००/- (अक्षरी दहा हजार रुपये फक्त) देण्याची विनंती केली आहे. पुढे जाबदेणार यांनी स्वतः अथवा इतरांमार्फत अर्जदाराचा कोणत्याही प्रकारचा शारिरिक व मानसिक छळ करू नये, असा प्रतिबंधात्मक आदेश जाबदेणार यांचे विरूध्द करणेत यावा व अर्जदाराला शारिरिक व मानसिक छळापासुन पोलीस स्टेशन मार्फत सरंक्षण देण्याचा आदेश व्हावा अशी विनंती केली आहे.

**१६.** संरक्षण अधिकारी यांचा अहवाल नि.७ वर दाखल केलेला आहे.

**<u>जाबदारचे म्हणणे/जबाबः</u>-**

**१७.** प्रस्तुत अर्जास जाबदार यांनी क्र. १२ अन्वये म्हणणे देवून अर्जदार हिच्या अर्जातील कथने नाकारलेली आहेत. जाबदारनुसार खरी परिस्थिती अशी आहे की, अर्जदार क्र. १ व जाबदेणार क्र. १ यांचे लग्नाचा खर्च अर्जदार क्र. १ हिचे वडिल व जाबदेणार क्र. २ यांनी समान हिश्श्याने केलेला आहे. अर्जदार क्र. १ हीचे मामा ज्ञानदेव बाबा शेळके हे निबोंडी येथीलच कायमचे रहिवाशी असून जाबदेणार क्र. २ यांचे घर लग्नाचेवेळी फार छोटे छप्पराचे होते. त्यामुळे लग्नाची सर्व व्यवस्था जाबदेणार यांचेकडे होत नव्हती म्हणून केवळ दि. २७/११/२०११ रोजी जाबदेणार क्र. २ व अर्जदार हीचे वडिल यांचे विचाराने अर्जदार क्र. १ हीचे मामा यांचेशी विचार विनीमय करुन निबोंडी येथे (पानमळा) लग्न पार पाडलेले आहे व त्याप्रमाणे वस्तुस्थिती आहे. सदर अर्जदार हीस स्वयंपाकाचा गॅस, सोफासेट, शेगडी, कुलर, शोकेस, कपाट, ड्रेसींग टेबल या वस्तू दिल्या नसून फक्त संसारउपयोगी भांडी दिवाण व गादी येवढयाच वस्तू लग्नात दिलेल्या होत्या. तसेच जाबदेणार क्र. १ यांस ४०,०००/- पगार आहे त्यामुळे लग्नांत चांगला झेंडा दया असे जाबदेणार म्हणाले नव्हते. अर्जदार ही जाबदेणार क्र. १ ते ३ याचेकडे

नांदावयास आली होती व सुरुवातीचे काही महिने कसे तरी नांदत होती. जाबदेणार यांचे कुटुंबात सात आठ माणसे असून दररोज शेतीचे कामावर जातात. जाबदेणार यांना तुटपुंजी शेती असलेने सर्व कुटुंबाची शेतीवर गुजरान होत नाही म्हणून जाबदेणार क्र. १ मुंबई येथे मजुरी करतात व स्वतःचा उदरनिर्वाह करून जाबदेणार क्र. २ व इतर कुटुंबाला मदत करतात. लग्नानंतरचे धार्मिक विधी पार पाडलेनंतर ते अर्जदार क्र. १ हिला नांदावयास घेवून गेले व लग्नानंतर जाबदेणार क्र. १ हे सुमारे एक महिना गावी निबोंडी येथे राहिले. अर्जदार क्र. १ हीचा हट्टी स्वभाव आहे. तिला निबोंडीत रहावयाचे नाही. शिवाय अर्जदार क्र. १ हीस जाबदेणार क्र. १ ने सोबत मुंबईला घेवून जावे व तेथे खोली करून ठेवावी असे हट्ट करीत आहे. सदरचे हट्ट पुरविणे व अर्जदार हीस मुंबईला घेवून राहणे सदर जाबदेणार क्र. १ यास परवडणारे नाही. सबब जाबदेणार क्र. १ हा खाजगी ठिकाणी नोकरी करतो, त्याचे तुटपंजे पगारातून त्याचे कसे तरी भागवून गावी जाबदेणार क्र. २ व ३ यांना थोडीफार मदत करीत असतो. त्यामुळे अर्जदार हीचेवर भडकण्याचा, चिडणेचा संबंध आलेला नाही. तसेच लग्नापूर्वी तुला मुंबईला रहावे लागेल असे म्हणणेचा प्रश्न उदभवलेला नाही.

**१८.** जाबदेणार क्र. १ हे लग्नानंतर सुमारे एक महिना निंबोडी येथे अर्जदारासह राहिले व तद्नंतर जाबदेणार क्र. १ मुंबईला त्यांचे नोकरीचे ठिकाणी गेले. जाबदेणार क्र. ४ सुशिला कोळेकर ही तिचे सासरी नांदत असून कधीतरी महत्वाचे कार्य व सणाचेवेळी निबोंडी येथे येत असते. जाबदेणार क्र. ४ हीचा कोणताही सहभाग अर्जदार व जाबदेणार क्र. १ ते ३ यांचे संसारात नव्हता. केवळ जाबदेणार क्र. ४ हिस त्रास देणेचे उद्देशाने या खटल्यात तिचे नाव गोवले आहे व जाबदेणार क्र. १ वर प्रेशर आणणेचा प्रयत्न अर्जदार करीत आहे. तसेच जाबदार क्र. २ व ३ हि अर्जदार हीस कोणताही त्रास देत नव्हते. केवळ जाबदार क्र. २ व ३ यांची खोटेपणाने नावे दाखल करून मन मानेल तसे अर्जदार हीस वागता यावे तसेच जाबदार क्र. १ ने मुंबईला घेवून जावे, सर्वांना मानसिक व आर्थीक त्रास व्हावा या उद्देशाने जाबदार क्र. २ व ३ वर खोटे आरोप केले असलेने अर्जदार हीचा अर्ज रद्द होणेस पात्र आहे.

**१९.** सदर जाबदेणार यांस निबोंडी येथे तुटपुंजी शेती असून जाबदेणार यांचे भाऊ भावजय असे एकत्र राहतात. शेतीतील सर्व खर्च वजा जाता शेतीचे उत्पन्नातून जाबदेणार याचे कुटुंबाचा खर्च भागत नाही. करीता जाबदेणार क्र. १ मुंबईला मजुरी

करतात व गावी महिन्यातून दोन ते तीन वेळा ये जा करुन देखभाल करीत असतात. तसेच जाबदेणार क्र. २ व ३ हे दुस–याचे शेतात जावून मोल मजुरी करतात. जाबदेणार यांचेकडे चार एकर बागायत क्षेत्र नाही. तसेच जर्शी गाई ही नाहीत. शिवाय अर्जदार हिस दिवसभर काम करणेचा, घालून पाडुन बोलून छळ करण्याचा प्रश्न आलेला नाही. तसेच जाबदेणार क्र. २ व ३ यांनी शेतातील कामाकरीता जाबदेणार क्र. १ यांचे कान भरणे, तसेच शेतातील काम करीत नाही असे सांगणेचा व त्या अनुषंगाने जाबदेणार क्र. १ अर्जदारास रागवणेचा उपाशी ठेवणेचा, मारहाण करणेचा प्रश्न आलेला नाही. सदर जाबदेणार क्र. १ याने अर्जदार क्र. १ हीस नोकरीबाबत व कोठे रहातो याबाबतची पूर्ण माहिती दिलेली होती व असलेने जाबदेणार क्र. १ कडे सर्व जाचहाट, छळ, माराहण व भिती सहन करून अर्जदार नांदत होती हा मजकूर खरा नाही.

२०. जाबदेणार क्र. १ ते ४ यांनी अर्जदार हीचा कधीही छळ केलेला नाही अगर दुसरे लग्नाला परवानगीही मागितलेली नाही. तसेच तू वाझोंटी आहेस तुला मुलबाळ होणर नाही, त्यामुळे दुसरे लग्न करायला परवानगी मागितलेली नाही त्यामुळे सर्वं जाबदेणार क्र. १ ते ४ यांचा छळ सहन करून मुंबईला नेले नाही तरी नांदत होती हा मजकूरही कल्पनीक असा असून केवळ सदरचा अर्ज दाखल करणेस खोटे कारण निर्माण करणेकरीता सदरचे खोटया तक्रारी केल्या असलेने अर्जदार हीचा अर्ज फेटाळणेस पात्र आहे.

२१. दि. १९/०८/२०१६ रोजी अर्जदार क्र. १ यांना मुलगी शिवांगी झाली. अर्जदार हीस लग्नानंतर गरोदरपणाचे दिवस गेलेनंतर अर्जदार हीची योग्य ती काळजी व देखभाल जाबदेणार क्र. १ ते ३ यांनी घेतली असून अर्जदार हीचे नववे महिन्यात अर्जदारचे वडिल बाळंतपणास वाटलूज येथे घेवून गेले. सदर जाबदेणार क्र. १ याने शिवांगीचा जन्म झालेनंतर तिला पहाणेसाठी गेलेवर योग्य ती खर्चाची रक्कम अर्जदार क्र. १ हीचेकडे दिलेली होती व बाळंतपणानंतर साधारण दोन महिन्यांनी अर्जदार व लहान मुलगीस जाबदेणार क्र. १ निबोंडी गावी घेवून आलेला होता.

२२. जाबदार क्र. १ महिन्यातून तीन ते चार वेळा गावी येत जात होते. दरम्यानचे काळात अर्जदार हीस पुन्हा दुस–यांदा दिवस गेलेने बाळंतपणासाठी

अर्जदार हीचे वडिल अर्जदारांस वाटलूज येथे माहेरी घेवून गेले. तथापी लहान मुलगी असलेने व अर्जदार ही गरोदर असलेने लहान मुलीचा सांभाळ करता येणार नाही म्हणून अर्जदार हीनेच शिवांगीला जाबदेणार क्र. २ व ३ यांचेकडे सांभाळ करणेस स्वतः ठेवले होते. शिवाय सदर शिवांगीस जाबदेणार क्र. २ व ३ चा लळा असून ती त्यांचेशिवाय राहात नाही. त्यामुळे शिवांगीला न पाठवणेचा अगर मनाविरुध्द ठेवून घेणेचा प्रश्न आलेला नाही. तसेच शिवांगी ही आई आई म्हणून आज अखेर कधीही रडलेली नाही व त्याकारणास्तव अर्जदाराचा मानसिक त्रास झालेला नाही. वास्तविक अर्जंदार हीचे कडे स्वतःचा मोबाईल नंबर ९६८९७८३८४९ असा होता व अर्जदार वेळ मिळेल तेव्हा आई वडिल मामा याचेशी मोबाइलवर बोलत होती. शिवाय अर्जदार हीचे आजोळ निबोंडी हेच असून अर्जदार हीचे मामा, मामी व आई वडिल वेळोवेळी अर्जदार हीस भेटत होते, त्यामुळे सदर अर्जातील कलमात केलेल्या तक्रारी मध्ये कोणतेही तथ्य नाही हे स्पष्ट होते.

**२३.** अर्जदार क्र. १ हीस दुसरे बाळंतपणासाठी तिचे आई वडिल वाटलूज येथे घेवून गेले व अर्जदारास दि ०६/११/२०१७ रोजी दुसरी मुलगी झाली तिचे नाव समृध्दी असे ठेवणेत आले. तथापी मुलगा मुलगी होणे हे अर्जदार हीचे हातात नाही याची महिती जाबदेणार यांस असलेने दुसरीपण मुलगी झाली मुलगा झाला नाही, तसेच तुला मुली होतात, मुलगा होत नाही. असे म्हण्णेचा प्रश्न आलेला नाही व त्या कारणास्तव मारहाण करणेचा प्रश्न उदभवलेला नाही. अर्जदार व तीचे मुली आजारी पडल्यावर योग्य तो औषध उपचार अर्जदार यांचेवर जाबदेणार करीत होते. अर्जदार हीचे वडिल ज्या ज्या वेळी अर्जदार हीस भेटणेस अगर माहेरी नेणेस येत होते त्या त्या वेळी अर्जदार हीस माहेरी जाबदार पाठवित होते. अर्जदारची थोरली मुलगी शिवांगी ही जाबदेणार क्र. २ व ३ यांचेबरोबर रहात असलेने व आजी आजोबाचा लळा असलेने रडून दंगा करणेचा अगर माहेरी न पाठवणेचा प्रश्न आलेला नाही. अर्जदार ही स्वतःहून जाबदेणार १ ते ३ यांचा त्याग करुन स्वखुषीने माहेरी राहत असलेने व जाबदेणार यांनी वेळोवेळी वाटलूज येथे जावून नांदावयास आणणेचा प्रयत्न करूनही जाणीवपूर्वक अटी घालून अर्जदार हीच नांदत नसलेने फोन न उचलणेचा अगर शिवीगाळ करणेचा व दुसरे लग्नास परवागनी मागणेचा प्रश्न उदभवलेला नाही.

**२४.** सदर अर्जदार हीस नांदावयास आणणेकरीता जाबदेणार क्र. १, २, ४,

सखाराम दिनकर कोळेकर, दादा जयराम शेळके व विठ्ठल गंगाराम कुंभार मौजे वाटलूज येथे गेलेले होते. त्यावेळी अर्जदार क्र. १ व तिचे आई वडिल यांनी अर्जदारास मुंबई येथे नेणार असाल तरच नांदावयास पाठवितो, त्यावेळी जाबदेणार क्र. १ यांनी मुंबईला आर्थीक कारणावरून नेणेची असमर्थता दाखविली. तथापी निबोंडी येथेच वेगळी खोली करून ठेवणेची व अन्न, वस्त्र, औषधे यांची जबाबदारी घेणेची तयारी दर्शविली तथापी त्यास अर्जदार व तिचे आई वडिलांनी नकार दिलेने जाबदेणार व साक्षीदार मोकळे हाताने परत आले त्यामुळे पाण्याचा तांब्या नाकारणेचा अगर आम्हांला मोकळे करा,सोडचिठठी द्या अगर धमकी देवून शिवीगाळ करणेचा प्रश्न उद्भवलेला नाही.

**२५.** अर्जदाराने त्याचे वकील ॲड. देशमुख याचेमार्फत दि. २९/११/२०२१ रीजी नोटीस पाठवलेली होती. सदर नोटीसीस जाबदेणार क्र. १ व २ यानी रितसर नोटीस उत्तर पाठविले होते व सदर नोटीसीसोबत अर्जदार हीस एस टी खर्च व इतर खर्चाकरिता रुपये १००० /– ची मनीऑर्डर केली होती. सदर नोटीस उत्तर व मनीऑर्डर अर्जदार व त्याचे वकीलांना मिळालेले आहे. यावरूनही सदर कलमात केलेली कथने काल्पनीक आहेत व नव–याची सर्व जबाबदारी जाबदेणार क्र. २ हे घेत आहे व बेफिकीरपणाचे वर्तन केले असे जे कथन केलेले आहे ते बालीशपणाचे आहे.

**२६.** अर्जदाराचे आई वडिलांना अर्जदार हीचे शिवाय दुसरी मुलगी वर्षा धनंजय ढेंगील रा. धर्मपुरी, ता. माळशिरस, जि. सोलापूर हिचे नव–याचे घरची आर्थीक परिस्थिती चांगली असून वर्षा हिस माहेरी रहाणे शक्य होत नाही. अर्जदार हीचे आई वडिलांना दोन मुली असून मुलगा नाही, शिवाय अर्जदार हिचे आई वडिल यांची स्वतःची शेती आहे. शिवाय घरचे शेतीत काम नसेल तेव्हा अर्जदाराचे आई वडिल अर्जदारासह इतर दुसरे लोकांचेकडे रोजंदारीचे कामावर घेवून जात असतात. अर्जदार हीस तिचे आई वडिलांनी लहानपणापासून लाडात वाढवलेली आहे. शिवाय सदर जाबदेणार यांनी वेळोवेळी वाटलूज येथे जावून शक्य तेवढी आर्थीक मदत केलेली आहे. त्यामळे अर्जदाराचे कपडेलत्ता, दवाखाना याचे कर्तव्य पार पाडणेचा अगर अर्जदारचे आई वडिलांनी धास्ती घेणेचा प्रश्न उद्भवलेला नाही. अर्जदाराचे आई वडिल धडधाकट असून आजारी नाहीत. त्यामूळे अर्धपोटी राहून जीवन जगण्याचाही प्रश्न येत नाही. त्याही कारणास्तव अर्जदार हीचा अर्ज फेटाळणेस पात्र आहे

**२७.** अर्जदार हीचे वकीलांमार्फत आलेले नोटीसीस जाबदेणार क्र. १ व २ यांनी नोटीस उत्तर दिलेले आहे. अर्जदाराची दुसरी बहीण हीचा विवाह झालेला असून ती तिचे सासरी नांदत असून तीचे पती तिला वेळोवेळी माहेरी पाठवत नाहीत. अर्जदाराच्या आई वडिलांना इतर कोणाचाही आधार नाही. त्यामुळे अर्जदार हीस जाणीवपूर्वक तिचे आई वडिल नांदावयास पाठवित नाहीत व अर्जदारासही नांदणेचे नाही. तिने स्वतःहून जाबदेणार यांचा त्याग केलेला आहे. सदर अर्जदार व तिचे आई वडिल अर्जदार हीचे संगोपन करण्यास समर्थ आहेत. शिवाय अर्जदार ही स्वतः कामधंदा करुन स्वतःचा सांभाळ करणेस समर्थ आहे. अर्जदारांना सदरचा अर्ज दाखल करणेस कोणतेही कारण घडलेले नसलेने सदरचा अर्ज दाखल करुन जाबदेणार यांना वेठीस धरुन अर्जदार क्र. १ ही स्वतःचे इच्छेप्रमाणे व मर्जीप्रमाणे जाबदेणार यांना वागणेस भाग पाडणेकरीता सदरचे खोटे अर्जाची रचना केली असलेने अर्जदार हीचा सदरचा अर्ज रदद होणेस पात्र आहे. जाबदेणार यांची आर्थीक परिस्थिती गरीबीची असून अर्जदार क्र. १ हीला दरमहा रु.७०००/- व अर्जदार क्र. २ हीस दरमहा ५०००/- असे एकूण दरमहा १२,०००/- रूपये देणेची जाबदेणार यांची ऐपत नाही. तसेच जाबदेणार यांनी स्वतः अगर इतरांमार्फत अर्जदार यांचा कोणताही शारीरीक व मानसिक छळ केलेला नसलेने पोलीस स्टेशनमार्फत संरक्षण देणेचा प्रश्न उद्भवत नाही. अर्जदारांची थोरली मुलगी शिवानी नसून शिवांगी अशी आहे. ती सध्या इयत्ता पहिलीमध्ये निबोंडी येथे शिक्षण घेत असून तिचे बालमनावर कोणताही परिणाम झालेला नाही अगर होणार नाही. फार तर अर्जदार हीने अर्जदार क्र. २ सह वरील जाबदेणार यांचेकडे नांदणेस यावे. करीता शिवांगीस अर्जदार हीचे स्वाधीन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. जाबदेणार यांनी अर्जदार हीचा कौटुंबिक, शारीरीक, मानसिक, व आर्थीक असे कोणतेही नुकसान केलेले नाही. जर काही नुकसान झाले असेल तर ते अर्जदार हिचे या व हट्टीपणाचे वागण्यामुळेच झालेले असलेमूळे अर्जदार हीस रुपये दोन लाख देणेचा भरणेची ऐपत या जाबदेणार यांची नाही. जाबदेणार क्र. १ ते ३ व जाबदेणार क्र. १ यांचे भाऊ, भावजय व त्यांची मुले यांचे एकत्र कुटुंब आहे. सदर एकत्र कुटुंबात ठेवणेची अगर नांदवणेची जाबदेणार यांची तयारी पूर्वीपासूनच होती व आजही आहे तथापी अर्जदार क्र. १ हीस जाबदेणार क्र. १ याचे एकत्र कुटुंबात रहावयाची इच्छा नसेल तर निबोंडी येथे अर्जदारांची स्वतंत्र खोली देवून अन्न, वस्त्र, औषधपाणी याची सोय करण्याची तयारी जाबदेणार क्र. १ यांची असून अर्जदार यांना नांदावयास नेणेस जाबदेणार क्र. १ पूर्वीपासून तयार होता व आजही आहे. अर्जदारांनी केवळ या जाबदेणार यास खर्चात

टाकणेसाठी तसेच जाबदाराचे वर दडपण आणून स्वतःचे मर्जीप्रमाणे रहाता यावे व वागता यावे याकरीता सदर रचना केली असलेने सदर अर्जाचे कामी उचलून पोटगी देणेची ऐपत या जाबदेणार यांचे नाही. त्यामुळे अर्जदारांना पोटगी देणेचा व अर्जाचा खर्च देणेचा प्रश्न उद्भवत नाही.

२८. सबब जाबदेणार यांची विनंती की, अर्जदार क्र. १ व २ यांना सदर जाबदेणार क्र. १ नांदविणेस पूर्वीपासून तयार होता व आजही आहे व सदर जाबदेणार क्र. १ अर्जदारांची निबोंडी येथे वेगळी खोली देवून अन्न, वस्त्र व औषधपाण्याची सोय करणेस तयार होता व आहे. अजेदार हीस सदर जाबदेणार मुंबई येथे आर्थीक कारणास्तव तसेच खोली भाडयाने घेवून रहाणेस घेवुन जाऊ शकत नाही. हिचा प्रस्तुतचा अर्ज फेटाळणे कायद्याने आवश्यक आहे. सदरचा अर्ज दाखल करणेस कोणतेही संयुक्तिक कारण घडलेले आहे. प्रस्तुत जाबदार हे अर्जदार यांस नांदविणेस आजही आनंदाने तयार आहेत. म्हणुन अर्जदार यांचा अर्ज खर्चासह रद्द होण्यास पात्र आहे.

२९. अर्जदाराची उपरोक्त कथने पाहता, पुढील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष मी त्यापुढे खाली नमुद कारणांसह देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | जाबदार क्र. १ ते ४ यांनी कौटुंबिक हिंसाचार केल्याचे अर्जदार सिध्द करते काय ? | **होय.** |
| ०२. | अर्जदार पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास किती ? | **अंशतः होय.** |
| ०३. | अर्जदार निवासी भत्ता मिळण्यास पात्र आहे का ? असल्यास किती ? | **अंशतः होय** |
| ०४. | अर्जदार संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहेत काय ? | **होय.** |
| ०५. | अर्जदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत काय ? | **नाही.** |

| ०५. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |
|---|---|---|

## कारणमिमांसा

**३०.** अर्जदारांतर्फे विधीज्ञ श्री. बी. व्ही देशमुख आणि जाबदारांतर्फे श्री. के. डी. शेळके यांचा युक्तीवाद ऐकला.

**३१.** अभिलेखाचे अवलोकन केले.

**अर्जदाराचा पुरावाः-**

**३२.** तोंडी पुराव्यामध्ये अर्जदार क्र. १ सारीका आनंद खरात तिचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र क्र. २० येथे दाखल केले आहे. त्यामध्ये तिने अर्जातील सर्व कथनांची पुनरावृत्ती शपथेवर केलेली आहे. तसेच जाबदार याने तिचे शारीरिक, मानसिक, भावनिक व आर्थिक छळ केल्याचे कथन केले आहे. अर्जदारानुसार तिला लग्नानंतर लगेच अपत्य झाले नाही म्हणून जाबदार याने वाझुंटी आहेस असे म्हणून तिचा मानसिक व भावनिक छळ केला होता. तसेच अपत्य झाले तरी फक्त मुलीच झाल्या मुलगा झाला नाही यासाठीदेखील अर्जदार हिचा लैंगिक व शाब्दीक छळ केला होता. अर्जदार ही माहेरी आल्यानंतर जाबदार यांना वारंवार सांगुनदेखील तिला परत घेऊन गेले नाही. तसेच अर्जदार हिची पहिली मुलीचे तिच्याकडून ताटातूट करुन जबरदस्तीने स्वतःजवळ ठेवून घेऊन तिचा भावनिक व मानसिक छळदेखील केलेला आहे. तसेच जाबदार हा अर्जदार हिला विनंती करुनदेखील नांदवायला घेऊन गेला नाही. वकीलांमार्फत नोटीस पाठविल्यानंतर जाबदार क्र. २ यांनी सदर नोटीसच्या खोटे उत्तर पाठवून मी जबाबदारी घेतो असे कथन करुन एक हजार रुपयाचे मनीऑर्डर एस.टी. खर्चासाठी पाठविले. कारण त्यांना शेतात काम करायला फुकटात मोलकरीण हवी होती. या सर्व कारणांमुळे अर्जदार हिला प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास भाग पडले आहे.

**३३.** उलटतपासात तिने मान्य केले आहे की, तिचे लग्नापूर्वीच नंदेचा लग्न झाला होता व ती तिच्या सासरी नांदत होती. तिचे सासू सासरे शेती करत होते आणि तिचा पती मुंबई येथे कामाला होता. तिचे मामा मामी निंबोडी येथे राहत होते व आईचे माहेरदेखील निंबोडीला असल्यामुळे त्यांच्याशी तिची नेहमी भेट होत होती. तिच्या लग्नानंतर दिराचे लग्क्र. २०१६ साली झाले आणि ते तिच्या पत्नीसोबत

आहिरे तालुका खंडाळा येथे राहतात. जाबदार क्र. १ हा तिच्या लग्नाच्या पूर्वीपासून मुंबई येथे काम करत होता. तिला मुंबईला राहायची व मुंबई बघायची इच्छा होती. परंतु लग्न झाल्यानंतर जाबदार याने तिला मुंबईला नेले नाही. ती सासरी नांदत असताना तिच्याकडे मुंबईल होता व ती मोबाईलवरुन माहेरी आणि मामांकडे जाबदार यांची तक्रार करत होती. तिला लग्नानंतर पहिली मुलगी साडेपाच वर्षानंतर झाली असल्याचे मान्य केले आहे. पहिली मुलगी झाल्यानंतर सव्वा ते दिड वर्षात दुसरी मुलगी झाली होती. दुस–या मुलीच्या बाळंतपणावेळी माहेरी जाताना तिने पहिलया मुलीला सासरी ठेवले होते हे अमान्य केले आहे. तिला प्रत्येक सणाला माहेरी जायची इच्छा होत होती व सन २०२० साली तिचे वडीलांनी तिला माहेरी घेऊन आले होते. जाबदार क्र. १ याने नांदायला यावी यासाठी वाई कोर्टात हिंदू मॅरेज पिटीशन ५००/२०२२ दाखल केल्याचे मान्य केले आहे. जाबदार क्र. १ आजही न्यायला तयार असेल तरी मला निंबोडी येथे राहायचे नाही म्हणून मी नांदायला तयार नाही असे तिने कथन केले आहे. तसेच जाबदार क्र. १ हा २ व ३ यांच्यापासून वेगळे ठेवण्यास तयार असेल तरीदेखील मी जायला तयार नाही असे तिने कथन केले आहे. पुढे तिने मान्य केले की, मुंबईला नेले तरच मी जाबदार क्र. १ सोबत राहायला तयार आहे. जाबदार क्र. १ हा मुंबई येथे पेइंग गेस्ट म्हणून इतर लोकांसोबत राहत असल्याचे मान्य केले आहे. परंतु मुंबईला वेगळी खोली करुन पत्नी आणि मुलींचा उदरनिर्वाह जाबदार क्र. १ त्याच्या पगारातून भागवू शकणार नाही हे अमान्य केले आहे. तसेच जाबदार याची पत्नीसाठी दरमहा ७ हजार आणि मुलींसाठी ५ हजार पोटगी देण्याची ऐपत नसल्याचे अमान्य केले आहे. जाबदार हे त्यांना एकत्र कुटुंबात अथवा स्वतंत्र खोलीची व्यवस्था करुन ठेवायला तयार असले तरीदेखील तिला नांदायचे नाही असे तिने कथन केले आहे. परंतु खोटी साक्ष देत असल्याचे अमान्य केले आहे.

**३४.** अर्जदाराने तिचे मालमत्ता, उत्पन्न व खर्च याबाबतचे प्रतिज्ञापत्र क्र. १५ वर दाखल केले आहे. तसेच तिचा पुरावा क्र. २७ च्या पुरसिस अन्वये बंद केला.

**<u>जाबदारचा पुरावाः–</u>**

**३५.** जाबदार क्र. १ आनंद नाना खरात याने सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि. ३२ येथे दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी त्यांच्या बचावाची पुनरावृत्ती शपथेवर केलेली आहे. जाबदाराने शपथेवर कथन केले आहे की, अर्जदार हिचा मुंबईला राहण्याचा

हट्ट असल्यामुळे आणि जाबदार याची मुंबई येथे वेगळी खोली करुन पत्नीला व मुलींना ठेवण्याची आर्थिक ऐपत नसल्यामुळे अर्जदार ही जाबदारसोबत नांदण्यास तयार नाही. अर्जदार हिला कोणत्याही प्रकारे कौटुंबिक हिंसाचार झालेला नाही. मुलगा किंवा मुलगी होणे ही स्त्रीच्या हातात नसते हे जाबदार यांना माहिती असल्यामुळे मुलगी झाली म्हणून अर्जदार हिचा मानसिक व भावनिक छळ केला ही बाब जाबदार याने स्पष्टपणे नाकारलेली आहे. त्याउलट अर्जदार हिने स्वतःहून तिच्या मोठया मुलीचा त्याग करुन तिला सोडून स्वतःहून माहेरी निघून गेलेली आहे. म्हणून मुलीपासून तिची ताटातूट केली हे नाकारले आहे. जाबदार हा अर्जदार हिला नांदविण्यास तयार आहे व त्यासाठी त्याने सर्व काही प्रयत्न केले आहे. तरीदेखील अर्जदार ही नांदण्यास येत नाही. सबब तिचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

**३६.** उलटतपासात त्याने मान्य केले आहे की, त्याचे शिक्षण पदवीपर्यंत झालेले असून लग्नाच्या एक दिड वर्षापूर्वीपासून मुंबईला नोकरीला लागला. परंतु मुलगी बघायला गेले असताना चाळीस हजार रुपये पगार आहे आणि लग्नानंतर पत्नीला मुंबईला घेऊन जाणार असे सांगितले असल्याचे अमान्य केले आहे. लग्नाच्या वेळी अर्जदाराच्या घरच्यांनी दिवाण, गादी, शोकेस, कपाट, स्वयंपाकाचा गॅस, शेगडी, सोफासेट, कुलर, ड्रेसिंग टेबल या सर्व प्रकारची संसारउपयोगी भांडीकुंडी दिल्याचे अमान्य केले आहे. साक्षीदाराने स्वतःहून सांगितले की, फक्त भांडीकुंडी दिली होती. लग्नानंतर ते अर्जासोबत ६ महिने गावी राहिले असल्याचे कथन केले व फक्त १ महिने राहून मुंबईला निघून गेले असल्याचे अमान्य केले आहे. अर्जदार ही मुंबईला घेऊन जाण्यासाठी विचारणा करत असल्यामुळे तिला चिडून जाऊन मारहाण केली असल्याचे अमान्य केले आहे. ते मुंबईला असताना अर्जदार ही इतर जाबदारांसोबत एकत्र कुटुंबात नांदत असल्याचे मान्य केले आहे. लग्नानंतर अर्जदार हिला फक्त दोन महिने व्यवस्थित नांदविल्याचे अमान्य केले आहे. इतर जाबदार हे अर्जदार घरातील कामे करत नाही अशी तक्रार करत असल्यामुळे अर्जदार हिला मारहाण केल्याचे अमान्य केले आहे.

**३७.** लग्नानंतर ४ वर्षांनी अर्जदार हिला दिवस गेले होते. परंतु तोपर्यंत तिला तू वांझुटी आहेस, आम्हांला मुलबाळ दे म्हणून सोडचिट्ठी दे असे म्हणून तिचा शारिरीक व मानसिक छळ केल्याचे अमान्य केले आहे. अर्जदार हिला पहिली मुलगी दि. १९.०६.२०१६ रोजी झाली व तीन महिन्यानंतर तिचे सासरे अर्जदाराला

घेऊन परत आल्याचे मान्य केले आहे. परंतु अर्जदार बाळंतपणात असताना तिची काळजी घेतली नसल्याचे अमान्य केले आहे. अर्जदार हिला दोन्ही मुलीच झाल्या म्हणून सर्व जाबदार यांनी तिचा अधिक छळ केला हे बाब स्पष्टपणे नाकारली आहे. दिवाळीला गेल्यानंतर अर्जदार हिने वारंवार तिला परत घेऊन जाण्यासाठी फोन करुन बोलावले. परंतु त्यांच्यापैकी कोणीही परत आणायला गेले नसल्याचे अमान्य केले आहे. २०२० मध्ये सर्व अर्जदार हिच्याकडे सोडचिठ्ठी मागायला गेले असल्याचे अमान्य केले आहे. अर्जदार हिने वकीलांमार्फत पाठविलेल्या नोटीसीला खोटे उत्तर पाठविल्याचेदेखील अमान्य केले आहे. जाबदार याने पती आणि वडील म्हणून अर्जदारांकडे असलेली जबाबदारी पार पाडली नसल्याचे अमान्य करुन अर्जदार ही नांदायला यावी यासाठी सातारा जिल्ह्यात अर्ज केले असल्याचे मान्य केले आहे.

**३८.** जाबदारतर्फे साक्षीदार क्र. २ दादा जयराम शेळके व ३ सखाराम दिनकर कोळेकर यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि. ४० व ४१ येथे दाखल केले आहे. हे दोन्ही साक्षीदार जाबदार याचे नातेवाईक असून जाबदार व अर्जदार यांच्या लग्नात हजर होते. तसेच या दोन्ही साक्षीदाराने कथन केले आहे की, सन २०२१ साली अकराव्या महिन्यात दुस–या आठवडयात दिवाळी झाल्यानंतर ते सर्व जण अर्जदार हिचे माहेरी वाटलूज येथे गाडी भाड्याने घेऊन अर्जदार सारिका व मुलगी समृध्दी यांना परत नांदायला आणण्यासाठी गेले होते. त्यावेळी अर्जदार यांचे आईवडीलांनी सांगितले की, अर्जदार हिला मुंबई येथे घेऊन जाणार असाल तरच नांदावयास पाठवतो. परंतु जाबदार व त्यांचे वडील यांनी सांगितले की, मुंबईला खोली घेऊन राहणे व इतर खर्च परवडणारा नाही म्हणून मुंबईला घेऊन जाणे शक्य होणार नाही. पण निंबोडी गावी वेगळी खोली करुन देतो व कपडालत्ता व अन्नधान्याची सोय करतो असे सांगितले असता अर्जदार व तिच्या आईवडीलांनी नांदावयास पाठविण्यास नकार दिला. त्यामुळे ते सर्वजण चहापाणी घेऊन मोकळ्या हाताने निंबोडी गावी परत आले. उलटतपासात ते अर्जदार हिला आणण्यासाठी गाडी करुन गेल्याचे खोटे सांगत असल्याचे अमान्य केले आहे. तसेच जाबदार हा त्यांचा नातेवाईक असल्यामुळे त्याला मदत करण्यासाठी खोटी साक्ष देत असल्याचे नाकारले आहे.

**३९.** जाबदाराने मालमत्ता, उत्पन्न व खर्च याबाबतचे प्रतिज्ञापत्र क्र. १७ वर

दाखल केले आहे. जाबदारने त्याचा पुरावा नि. ४२ येथील पुरसिसने बंद केला आहे.

**अविवादित तथ्यः–**

**४०.** अर्जदार व जाबदार क्र. १ यांचे लग्न दि. २७.११.२०११ रोजी हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे निंबोडी गावात अर्जदार हिच्या मामाच्या दारात सर्वांच्या संमतीने व पसंतीने पार पडले याबाबत दुमत नाही. सदर अर्जदार क्र. १ हिला जाबदार क्र. १ याच्याकडून दोन मुली नामे शिवांगी आणि समृध्दी अशी अपत्ये झाली हे अविवादीत तथ्य आहेत. तसेच वाई कोर्टात जाबदार याने अर्जदार हिला नांदायला येण्यासाठी कोर्टात मॅरेज पिटीशन नं. ५००/२०२२ दाखल केला याबाबतदेखील वाद नाही. जाबदार याचे शिक्षण पदव्युत्तरपर्यंत झालेले आहे आणि तो लग्नापूर्वीपासून मुंबईला कामास होता हे दोन्ही पक्षाने मान्य केले आहे.

**मुद्दा क्रमांक १ करिता – कौटुंबिक हिंसाचाराबाबतः–**

**४१.** सदरचा मुद्दा सिध्द करण्यासाठी अर्जदार हिने तोंडी व लेखी पुरावा दिलेला आहे.

**४२.** पटलावर आलेल्या सर्व तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येत की, अर्जदार व जाबदार यांचा विवाह ठरवून दि. २७.११.२०११ रोजी निंबोडी येथे अर्जदार हिच्या मामाच्या दारात झाला होता. निंबोडी हे अर्जदार हिचे आजोळ असून तिचे आईवडील त्या गावात नेहमी येत असतात. अर्जदाराच्या कथनानुसार सदर लग्नाचा संपूर्ण खर्च तिच्या वडीलांनी पाच लाख रुपये कर्ज काढून केला होता. परंतु त्याबाबत कागदपत्र पटलावर हजर केलेले नाही. त्याउलट जाबदार याच्यानुसार लग्नाचा खर्च दोन्ही पक्षांनी मिळून केला होता. सदर लग्नात अर्जदारानुसार संसारउपयोगी वस्तू जसे की, दिवाण, गादी, शोकेस, कपाट, स्वयंपाकाचा गॅस, शेगडी, सोफासेट, कुलर, ड्रेसिंग टेबल दिल्या होत्या. परंतु त्याबाबत बिल पावती अथवा लग्नातील यादी हजर केलेली नाही. सदरच्या वस्तू जाबदार यांच्या मागणीवरुन दिल्या होत्या असे दाखविणारा देखील कागदोपत्री पुरावा पटलावर नाही. परंतु जाबदार याने मान्य केले आहे की, लग्नात संसारउपयोगी भांडीकुंडी आणि दिवाण व गादी दिल्या होत्या. मान्य केलेल्या तथ्य सिध्द करायची

आवश्यकता नाही. त्यामुळे अर्जदार व जाबदार यांच्या लग्नात संसारउपयोगी भांडीकुंडी व दिवाण आणि गादी दिल्याचे दिसून येते.

**४३.** लग्नाच्यापूर्वीपासून जाबदार हा मुंबई येथे कामाला होता. अर्जदारनुसार तो ट्रान्सपोर्टचा व्यवसाय करत होता आणि त्याला दरमहा ४०,०००/- रुपये इतका पगार होता. परंतु जाबदार याला चाळीस हजार पगार असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा पटलावर नाही. जाबदार हा कुठे नोकरी करत होता याबाबतचादेखील कोणताही पुरावा पटलावर नाही. त्याउलट अर्जदाराच्या कथनानुसार जाबदार हा मुंबईत कुठे राहतो व कुठे काम करतो याचा ठावपत्ता तिला माहित नसल्यामुळे जाबदार याला नोटीस पाठविण्यास त्रास झाला. यावरुन अर्जदार हिला जाबदार नेमका कोणतया प्रकारचा काम करतो आणि किती कमवितो याबाबत माहिती नसल्याचे दिसून येते. उलटतपासात अर्जदार हिने मान्य केले आहे की, तिला मुंबई बघायची इच्छा होती आणि मुंबईला जाबदारसोबत वेगळी खोली करुन राहायचे आहे. त्यासाठीच अर्जदार ही सतत जाबदार याला विचारणा करत असे. परंतु जाबदार याच्या कथनानुसार मुंबई येथे तो पेइंग गेस्ट म्हणून इतर पुरुषांसोबत राहत असल्यामुळे पत्नीला व मुलींना घेऊन त्या ठिकाणी राहणे शक्य नाही. तसेच अर्जदार व मुलींची वेगळी खोली घेऊन सोय करणे त्याला आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. त्यामुळे जाबदार हा अर्जदार हिचा मुंबईला राहण्याचा हट्ट पुरवू शकला नाही. म्हणून अर्जदार ही जाबदार यांच्याशी व्यवस्थित वागत नव्हती आणि तिने स्वतःहून जाबदार क्र. १ याचा त्याग केलेला आहे. जाबदार क्र. १ आजदेखील अर्जदार व मुलींना नांदविण्यास तयार आहे. त्यासाठी त्याने वाई कोर्टात अर्जसुध्दा दाखल केलेला आहे. परंतु अर्जदार ही नांदायला येण्यास तयार नाही. उलटतपासातदेखील अर्जदार हिने मान्य केले आहे की, ती जाबदारसोबत निंबोडी येथे नांदायला तयार नाही. जाबदार हा इतर जाबदारांपासून वेगळी खोली करुन ठेवण्यास तयार असूनदेखील अर्जदार हिने नांदण्यास नकार दिला आहे. परंतु मुंबईला घेऊन गेल्यास नांदायला तयार असल्याचे मान्य केले आहे.

**४४.** पटलावर आलेल्या इतर साक्षीदारांनी देखील असेच कथन केले आहे की, नोव्हेंबर २०२१ मध्ये ते गाडी करुन अर्जदार व तिच्या मुलीला नांदायला आणण्यासाठी गेले होते. परंतु अर्जदार आणि तिच्या आईवडीलांनी मुंबईला घेऊन जाणार असाल तरच पाठवितो असे कारण देऊन नांदवायला पाठविण्यास नकार

दिला. या सर्व परिस्थितीवरुन असे दिसून येते की, अर्जदार हिचा मुंबईला जाऊन राहण्याचा हट्ट आहे. जो जाबदार पुरवण्यास सक्षम नाही. त्यामुळे अर्जदार व जाबदार यांच्यामध्ये वाद झालेले आहे. अर्जदार हिच्या इतर कथनांबाबत की, तिला लग्नानंतर मूलबाळ होत नव्हते आणि मुलीच झाल्या म्हणून जाबदारांनी मानसिक व भावनिक छळ केला याबाबत शाश्वती वाटत नाही. कारण २०११ साली लग्न झाल्यानंतर साडेपाच वर्षे अर्जदार हिला मुलबाळ नव्हते. परंतु वादातील अर्ज हा त्या काळात दाखल केलेला नसून, २०२२ साली दाखल झालेला आहे. तसेच अर्जदार हिच्या कथनानुसार जर जाबदार यांना मुली नको होत्या तर अर्जदार हिची मोठी मुलगी ही तिच्या जन्मापासून ते आजपर्यंत त्यांच्याच ताब्यात आणि देखभालीत आहे. जर जाबदार यांना मुली नको होत्या तर त्यांनी त्या मुलीचा त्याग केला असता. त्याउलट पटलावरील पुराव्यावरुन असे दिसून येते की, मोठया मुलीला अर्जदार हिने दुस–या मुलीसाठी लगेच गरोदर राहिली असल्यामुळे जाबदार यांच्याकडे सोडले होते. तसेच २०२० साली दिवाळी सणासाठी येतानादेखील अर्जदार ही तिच्या मोठया मुलीला सोबत घेऊन आली नव्हती. मोठी मुलगी ही जाबदार यांच्यासोबतच आजपर्यंत राहत आहे. प्रस्तुतचा अर्ज हा २०२२ पासून प्रलंबित असून आजपर्यंत मोठ्या मुलीच्या ताब्याकरीता अथवा तिला भेटण्याच्या अधिकारासाठी अर्जदाराने कोणताही अंतरिम अर्ज दाखल केलेला दिसून येत नाही. यावरुन अर्जदार हिने स्वतःहून मोठया मुलीला जाबदार यांच्याकडे सोडल्याचे तिच्या वर्तनावरुन दिसून येत आहे. तसेच अर्जदार हिने जाबदारांनी तिला नेमकी कोणत्या घटनेमधून काय शिवीगाळ केली याबाबत तपशीलवार नमूद केलेले नाही. फक्त मोघम स्वरुपात मारहाण केली व शिवीगाळ केली असे सांगितले आहे. परंतु नेमकी काय घटना घडली त्याचा तपशीलवार वर्णन पटलावर आलेला नाही. तसेच इतर साक्षीदार जसे अर्जदाराचे आई वडील, मामा ज्यांच्याशी ती सतत मोबाईलवर बोलत होती त्यांना तपासलेले नाही. कौटुंबिक हिंसाचार सिध्द करण्यासाठी हिंसाचाराची घटना कशी घडली, काय घडले, कशा प्रकारे छळ झाला याबाबत सविस्तर नमूद करणे आवश्यक आहे. कारण या घटनेबाबत फक्त अर्जदार हिलाच माहिती असते. या घटनेचा तपशील अर्जात व पुराव्यात नमूद करणे अर्जदाराला अपेक्षित होते. फक्त मोघम आरोप की, शिवीगाळ व मारहाण केली पुरेसे नाही.

**४५.** परंतु कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना या घरातील चार भिंतीच्या आत होत असल्यामुळे त्यांचा पुरावा म्हणून अर्जदार हिच्या शपथेवरील प्रतिज्ञापत्र पुरेसा

आहे, असे न्यायतत्व या कायद्यात मांडलेले आहे. तसेच अर्जदार ही २०२० पासून तिच्या माहेरी राहत आहे. परंतु जाबदार याने अर्जदार व तिच्या मुलींची राहण्याची, खाण्यापिण्याची सोय केली आहे याबाबत कोणताही पुरावा पटलावर आलेला नाही. त्याउलट नि. ५ वर आदेश होऊनदेखील जाबदार याने अर्जदारांच्या उदरनिर्वाहाकरिता कोणतीही रक्कम भरलेली दिसून येत नाही. त्यामुळे जाबदार क्र. १ याने अर्जदार यांचा आर्थिक छळ केला हे सिध्द होते. जाबदार क्र. १ हा पती आणि वडील म्हणून अर्जदारांची आर्थिक जबाबदारी पार पाडण्यास असफल झाला आहे. त्यामुळे अर्जदारांवर आर्थिक अत्याचार झालेला आहे. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ करिता – पोटगीबाबतः–</u>**

**४६.** अर्जदार व जाबदार क्र. १ यांचा विवाह झाला हे अविवादीत तथ्य आहे व सदर विवाहातून अर्जदार यांना दोन मुली शिवांगी आणि समृध्दी यांचा जन्म झाला हेदेखील दोन्ही पक्षकारांनी मान्य केले आहे. त्यामुळे अर्जदार आणि त्यांच्या मुलींची आर्थिक जबाबदारी जाबदार क्र. १ यांच्यावर पती व वडील म्हणून आहे. परंतु जाबदार क्र. १ याने ती जबाबदारी पार पाडल्याची दिसून येत नाही. मुद्दा क्र.१ च्या चर्चेतून निष्पन्न झालेल्या निष्कर्षातून अर्जदार हिला जाबदार यांच्याकडून आर्थिक अत्याचार झाला हे सिध्द झालेले आहे. न्यायालयात पारित आदेशाचे देखील पालन झालेले नाही व जाबदार याने अर्जदार हिला अंतरिम पोटगी अदा केलेली दिसून येत नाही. २०२० दिवाळीपासून अर्जदार हि तिच्या वडीलांकडे माहेरी राहत आहे. जाबदाराने पुरावा दिला असला तरीदेखील अर्जदार हिला जाबदार याने वेळोवेळी खर्चासाठी व दैनंदिन गरजा पूर्ण करण्याकरिता पोटगी दिली हे जाबदार दाखवू शकलेला नाही. त्याउलट न्यायालयाचे आदेश असूनदेखील जाबदाराने कोणतीही पोटगीची रक्कम अदा केलेली नाही. त्यामुळे जाबदार याने वडील आणि पती म्हणून जबाबदारी पार पाडलेली नाही हे सिध्द होते व अर्जदार हिच्या विरुध्द आर्थिक अत्याचार केल्याचे देखील सिध्द होत आहे.

**४७.** अर्जदाराने शपथेवर कथन केले आहे की, जाबदार हा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय करुन त्याला दरमहा ४०,०००/– रुपये इतके उत्पन्न मिळते. अर्जदार हिच्यासोबत लहान मुलगी असून त्यांचा महिन्याचा खर्च १५,०००/– रुपये इतका

आहे. तसेच जाबदार याच्या नावावर सातारा येथे जमीन मिळकत असून त्याला शेतीतून देखील उत्पन्न मिळते. त्याबाबत ७/१२ उतार पटलावर दाखल केलेले आहे. जाबदार यानेदेखील त्याच्या उत्पन्न व दायित्वाच्या प्रतिज्ञापत्रात त्याचे बी.ए. पर्यंत शिक्षण झालेले असून तो मुंबईला मजुरी करुन दररोज ५००/– रुपये कमवितो. जाबदार याच्यावर त्याचे आईवडीलांची जबाबदारी आहे आणि मोठी मुलगीदेखील त्याच्यासोबत राहते. शेतीचे उत्पन्न पुरेसे नाही. त्यामुळे त्याला मजुरी करावी लागते. अर्जदार ही काहीही काम करत नाही व तिचे शिक्षण इयत्ता १० वी पर्यंत झालेले आहे. जाबदार हा अर्जदार हिला एकत्र नांदवायला तयार असून अर्जदार हिची जाण्याची तयारी नाही. परंतु त्या कारणासाठी जाबदार हा त्याचा पती आणि वडील म्हणून असलेले कर्तव्य नाकारु शकत नाही. ज्याप्रमाणे अर्जदार व मुली सोबत राहिल्यावर त्यांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी जाबदार क्र. १ याने पार पाडली असती, त्याचप्रमाणे ते वेगळे राहत असले तरीदेखील त्यांच्या पोटगीसाठी व दैनंदिन खर्चाकरिता सोय करण्याची जबाबदारी जाबदार क्र. १ याचीच आहे. परंतु जाबदार याची जबाबदारी पाहता आणि मोठी मुलगीदेखील त्याच्यासोबत असल्यामुळे तिची जबाबदारीदेखील जाबदार क्र. १ वर आहे. तसेच जाबदार हा मजुरी करुन दररोज ५००/– रुपये कमवितो. परंतु तो शारिरीकदृष्ट्या सक्षम असल्याने अर्जदारांची जबाबदारी पार पाडण्यास बांधील आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ व २ यांच्या दैनंदिन गरजांकरिता अन्न, वस्त्र, शैक्षणिक खर्च, औषधोपचार या सर्व खर्चांसाठी दरमहा ५०००/– रुपये अर्जदार यांना देणे न्यायोचित वाटत आहे. अंतरिम पोटगीचा आदेश होऊनदेखील जाबदाराने त्याचे पालन केलेले दिसून येत नाही. त्यामुळे सदरची पोटगी ही अर्ज दाखल तारखेपासून देण्यात येत आहे. सबब, मुद्दा क्र.२ चे उत्तर मी अंशतः होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ३ करिता – निवासी आदेशाबाबतः–</u>**

४८. अर्जदार ही २०१९ पासून तिच्या माहेरी जाबदार यांच्यापासून विभक्त राहत आहे. अर्जदाराने तिच्या अर्जात जाबदार याची एकत्र कुटुंबात ठेवण्याची तयारी नसेल तर त्यांनी स्वतंत्र खोलीची व्यवस्था करावी अथवा दरमहा ३,०००/– रुपये घरभाडे म्हणून देण्याचे मागणी केली आहे. परंतु पटलावरील पुराव्यावरुन असे दिसून येते की, जाबदार याचे अर्जदार हिला एकत्र कुटुंबात ठेवायची तयारी आहे. तसेच तिला एकत्रात राहायचे नसेल तर वेगळी खोली करुन ठेवायची देखील तयारी

आहे. अर्जदार हिने उलटतपासात मान्य केले आहे की, जाबदार यांचे दोन घर आहेत. एक कौलारु छपराचे आणि दुसरे पत्र्याचे घर आहे. तसेच अर्जदार हिची मोठी मुलगी ही जाबदार यांच्यासोबतच राहत आहे. त्यामुळे अर्जदार व तिच्या लहान मुलीची व्यवस्था जाबदार याने या दोन घरांपैकी एका घरात करावी. त्यामुळे दोन्ही मुलींना एकमेकांची साथ मिळेल आणि आईवडीलांची मायादेखील एकत्रात मिळेल. अर्जदार हिचे माहेरी घर फक्त एक खोलीचे असून त्यामध्ये तिचे आईवडील व आजी व अर्जदार असे राहत आहेत. म्हणून त्या छोट्या खोलीत त्यांना राहणे सोयीचे नाही. अर्जदार व मुलगी लहान असल्यामुळे त्यांना स्वतंत्र खोली करुन एकटे ठेवणेदेखील योग्य होणार नाही. त्यामुळे जाबदार यांनी अर्जदारांची निंबोडी येथील दोन घरांपैकी एका घरात वेगळी राहायची सोय करणे अर्जदार व तिच्या दोन्ही मुलींसाठी योग्य होईल. म्हणून जाबदार याला त्याप्रकारे निकाल तारखेपासून दोन महिन्याच्या आत तशी व्यवस्था करण्याचे आदेश देण्यात येत आहेत. सबब, मुद्दा क्र.४ चे उत्तर मी होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ४ करिता – संरक्षणात्मक आदेशाबाबतः–</u>**

**४९.** मुद्दा क्र.१ च्या होकारार्थी उत्तरावरुन अर्जदार हिला जाबदारांकडुन कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे सिध्द झाले आहे.तसेच अर्जदार हिला निवासासाठी जाबदार याने एकत्र कुटुंबातील घराजवळ स्वतंत्र सोय करावी असा आदेश मुद्दा क्र. ३ च्या उत्तरात नोंदविण्यात आलेला आहे. त्यामुळे भविष्यात कोणत्याही प्रकारचा शाब्दीक, भावनिक, मानसिक किंवा आर्थिक प्रकारचे कौटुंबिक हिंसाचार अर्जदार यांच्याविरुध्द होऊ नये याकरिता जाबदार यांच्याविरुध्द संरक्षण आदेश पारित करण्यात येत आहे. सबब मुद्दा क्र. ४ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ५ करिता – नुकसान भरपाईः–</u>**

**५०.** मुद्दा क्र.१ च्या होकारार्थी उत्तरामुळे जाबदार यांनी अर्जदार हिचा आर्थिक छळ केल्याचे सिध्द झालेले आहे. अर्जदार हिची मुंबई येथे राहण्याच्या हट्टामुळे तिने जाबदार याचा आणि मोठया मुलीचा त्याग केलेला दिसून येत आहे. जाबदार हा अर्जदार हिला एकत्र नांदावयास तयार आहे आणि त्यासाठी त्याने अर्जदेखील दाखल केलेला आहे. म्हणून अर्जदार हिच्या वर्तणुकीमुळे ती वेगळी राहत आहे. त्यामुळे तिला नुकसान भरपाई देणे योग्य होणार नाही. सबब, मुद्दा क्र.५

चे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ६ करिताः–</u>**

**५१.** उपरोक्त बाबींचा विचार करता व मुद्दा क्र.१ ते ५ चे निष्कर्ष पाहता, अर्जदार यांचा अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र.६ च्या निष्कर्षाप्रत मी पुढील आदेश पारित करीत आहेः–

## आदेश

**१.** अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

**२.** जाबदार क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ व २ यांना अर्ज दाखल तारखेपासुन दरमहा र.रु.५,०००/– (रुपये पाच हजार मात्र) अंतीम पोटगीच्या स्वरुपात द्यावे.

**३.** जाबदार क्र. १ यांनी अर्जदार यांना आदेश तारखेपासुन दोन महिन्याच्या आत अर्जदार यांची राहण्याची सोय एकत्र कुटुंबाजवळ स्वतंत्र खोलीमध्ये करावी आणि त्यामध्ये राहण्यासाठी सर्व आवश्यक ती व्यवस्था करावी.

**४.** जाबदार यांनी अर्जदार यांचेविरुध्द भविष्यात कोणत्याही प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार करु नये असा संरक्षणात्मक हुकूम देण्यात येत आहे.

**५.** सदर अर्जाचा खर्च र.रु.५,०००/– (रुपये पाच हजार मात्र) जाबदार यांनी अर्जदार यांना देण्याचा आहे.

**६.** सदर न्यायनिर्णयाची प्रत अर्जदार क्र. १ व जाबदार क्र. १ यांना विनामुल्य देण्यात यावी.

**७.** सदर न्यायनिर्णयाची प्रत संरक्षण अधिकारी, ता. दौंड, जि. पुणे आणि निंबोडी, ता. खंडाळा, जि. सातारा यांच्याकडे अंमलबजावणी करीता पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित)

SHABNAM ANSAR VIRANI
Digitally signed by SHABNAM ANSAR VIRANI
Date: 2026.03.10 16:31:46 +0530

ठिकाणः– दौंड.
दिनांकः– ०७.०३.२०२६.

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, दौंड, जि. पुणे.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of judgment are same, word to word, as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S. A. Kanaki |
| Name of the Court | : | Smt. S. A. Virani,<br>J.M.F.C., Daund, Dist. Pune. |
| Judgment date | : | 07.03.2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 10.03.2026 |
| Judgment uploaded on | : | 10.03.2026 |